पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुके/१/कावि/ ६०९ /२०१३
दि. ०२ /९/२०१३

विषय :- **नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात येणा-या सुविधाकरिता लागणा-या प्रतिज्ञापत्राऐवजी स्वघोषणापत्र घेणे. . .**

संदर्भ :- **माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र.MH-९०२१/११/२०१३-DIT(MH)-DIT(MH)/39 दि.१४/०८/२०१३**

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना विविध प्रकारचे दाखले / परवाने विहित कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर दाखले / परवाने साठी अर्ज, आवश्यक असणारे कागदपत्रे इ. संबंधित विभागांनी निर्धारित केली आहे.

नागरिकांना या सेवा सुलभ रितीने उपलब्ध व्हाव्यात म्हणून अर्जासोबत स्वतंत्र प्रतिज्ञापत्र सादर करण्याऐवजी आवश्यक असणारी माहिती आणि अर्जदाराचे स्वघोषणापत्र (Self Declaration) एकाच अर्जात घेणेबाबत दि.१४/०८/२०१३ चे शासन निर्णयाद्वारे कळविणेत आले आहे.

सबब सर्व विभागप्रमुखांनी दि.१४/८/२०१३ चे शासन निर्णयानुसार महानगरपालिकेकडून नागरिकांना नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात येणा-या विविध प्रकारचे दाखले / परवाने मध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक असते अशा सर्व दाखले / परवाने साठी यापुढे अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्राऐवजी, स्वघोषणापत्राचा समावेश अर्जामध्ये करावा. अर्जामध्ये समाविष्ट करावयाचे स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणे राहील.

(डॉ.श्रीकर परदेशी)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

सोबत :- प्रपत्र अ व संदर्भिय शासन निर्णय

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,
१) मा.अति.आयुक्त कक्ष.
माहितीसाठी.
२) ई-गव्हर्नन्स विभाग.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

नागरी सुविधा केंद्र,

परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/६०९ /२०१३ दि. ०२/९/२०१३ चे लगत प्रपत्र अ

## स्वघोषणापत्र (मराठी)

मी ------------------श्री. -------------------- यांचा मुलगा / मुलगी वय ----वर्षे व्यवसाय ------------------ राहणार ------------------------------- घोषित करतो / करते की वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता १९६० कलम १९९ व २०० व अन्य / संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : -------------- अर्जदाराची सही : -------------------------

दिनांक : -------------- अर्जदाराचे नाव : -------------------------

## Self Declaration (In English)

I ________________________son/daughter of _______________aged ________ occupation _____________________resident of ______________________ hereby declare that the information provided above is true and correct to the best of my personal knowledge, information and belief. I fully understand the consequences of giving false information. If the information as given above is found to be false, I shall be liable for prosecution and punishment under section १९९ and २०० of IPC १९६० and / or any other law applicable thereto.

Place : ________ Applicant Signature : _________________

Date : ___ / ___ / ___ Applicant Name : _________________